महाराष्ट्र शासन
OFFICE OF THE DEAN, GOVT, AYURVED COLLEGE, VAZIRABAD, NANDED
Grade "A" accreditation by Quality Councila of India
अधिष्ठाता यांचे कार्यालय, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, वजिराबाद, नांदेड
भारतीय गुणांकन परिषदेद्वारा "अ" दर्जा प्राप्त
PH & Fax No. (02462) 234026 E-mail—gac.nanded@gmail.com

जा.क्र.शाआमनां/आस्था/डे-१/ 4020 /२०२५ दि. 28/08/२०२५

# शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,नांदेड

# जाहिरात

## कंत्राटी पध्दतीने अध्यापकांची पदे भरणेबाबत

संदर्भ :- १) शा.नि.वै.शि.व औ.द्र.वि.क्रं. एमईएस१५०८/प्र.क्रं.९४/०८/वैसेवा:१, दि.०७.०९.२०११
२) शा.नि.वै.शि.व औ.द्र.वि.क्रंआयुसे-१०२१/प्र.क्रं.१३०(भाग-१)/आयु-१, दि.०४.११.२०२२

उपरोक्त संदर्भित शासन निर्णयान्वये निर्देशित केल्यानुसार, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड येथील विविध विषयांच्या प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक या पदांवर केवळ ११ महिन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यासाठी विहित अटी व शर्तीची पूर्तता करणा-या पात्र व इच्छुक उमेदवारांनी थेट मुलाखतीसाठी (Walk-In-Interview)आवश्यक त्या मूळ प्रमाणपत्र व इतर कागदपत्रांसह दिनांक ०८.०९.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता या महाविद्यालयात उपस्थित रहावे.

**रिक्त पदांचा प्रवर्गनिहाय तपशिल -**

| विषय | प्राध्यापक | | सहयोगी प्राध्यापक | | सहाय्यक प्राध्यापक | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकुण रिक्त पदे | आरक्षण (सर्वसाधारण) | एकुण रिक्त पदे | आरक्षण (सर्वसाधारण) | एकुण रिक्त पदे | आरक्षण (सर्वसाधारण) |
| संहिता सिध्दात | - | - | - | - | ०२* | ०२ |
| संस्कृत | - | - | - | - | ०१* | ०१ |
| शरीररचना | - | - | - | - | ०१* | ०१ |
| क्रिया शारिर | - | - | - | - | ०१* | ०१ |
| द्रव्यगुण | - | - | - | - | ०२* | ०२ |
| रसशास्त्र | - | - | ०१* | ०१ | ०१ | ०१ |
| रोगनिदान | - | - | - | - | ०१* | ०१ |
| स्वस्थवृत्त | - | - | - | - | ०१* | ०१ |
| कायाचिकीत्सा | - | - | १ + १* | ०२ | ०१ | ०१ |
| पंचकर्म | ०१* | ०१ | - | - | ०२* | ०२ |
| शल्यतंत्र | - | - | ०१* | ०१ | ०२* | ०२ |
| शालाक्यतंत्र | - | - | - | - | ०२* | ०२ |
| स्त्रीरोग प्रस्तुतीतंत्र | - | - | ०२ | ०२ | ०१* | ०१ |
| कौमारभृत्य | | | ०१ | ०१ | - | - |
| **एकुण** | **०१** | **०१** | **०७** | **०७** | **१८** | **१८** |

* संभाव्य रिक्त होणारी पदे

**टिप** – *मुलाखतीच्या दिवसापर्यंत/रुजू दिनांकापर्यंत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून/पदोन्नतीने किंवा बदलीने संबंधित विषयातील प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/सहाय्यक प्राध्यापक पदाचा उमेदवार उपलब्ध झाल्यास, त्या संबंधित विषयातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक पदासाठी संबंधित उमेदवारांचा नियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही.*

| पदनाम | : | **प्राध्यापक** |
|---|---|---|
| **वयोमर्यादा** | | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत (परंतु सदर अध्यापकांची त्याच्या वयाच्या ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत त्यांचा किमान ११ महिन्यांचा सेवाकालावधी पूर्ण होणे आवश्यक राहील) |
| **शैक्षणिक अर्हता व अनुभव** | | १) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२८) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग अ,भाग-अ-१, भाग-ब किंवा भाग-क या मध्ये नमुद केलल्या अर्हतापैकी एक अथवा भारतीय चिकित्सा केंद्रीय वैद्यक परिषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद/ भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग यांनी वेळोवेळी निर्देशित केलेली समतुल्य अर्हता.<br>२) सांविधानिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबंधित आयुर्वेद विषयातील पदव्युत्तर पदवी.<br>३) ज्या उमेदवारांचे आयुर्वेद विषयातील स्वतःचे मूलभूत संशोधन, निबंध अथवा पुस्तक, प्रसिध्द झालेली आहेत अशा उमेदवारांना प्राध्यान्य देण्यात येईल.<br>४) शैक्षणिक अर्हतेमधील (१) व (२) येथे दर्शविलेली अर्हता प्राप्त करुन घेतल्यानंतर, संबंधीत आयुर्वेदाच्या विषयामध्ये एकुण दहा वर्षाचा अध्यापनाचा अनुभव आवश्यक असेल त्यापैकी मान्यता प्राप्त संस्थेतून संबंधीत आयुर्वेद विषयाचे सहयोगी प्राध्यापक पदाचा किमान पाच वर्षे अध्यापनाचा अनुभव असणे आवश्यक राहील.<br>५) इंग्रजी, मराठी, संस्कृत आणि हिंदी या भाषेचे पुरेसे ज्ञान असावे म्हणजे त्यानुसार तो त्या भाषा सहजपणे लिहिण्यास, वाचण्यास व बोलण्यास समर्थ असला पाहिजे.<br>६) भा.चि.के.प/भा.चि.प.राष्ट्रीय आयोगाने निश्चित केलेला शिक्षक सांकेतांक (Teacher code) असणे आवश्यक आहे. |
| **मानधन** | | प्रतिमाह रु १,५०,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत. तसेच सदर मानधन हे अनुदान उपलब्धतेच्या व उमेदवाराच्या उपस्थितीनुसार अदा करण्यात येईल) |

| पदनाम | : | **सहयोगी प्राध्यापक** |
|---|---|---|
| **वयोमर्यादा** | | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत (परंतु सदर अध्यापकांची त्याच्या वयाच्या ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत त्यांचा किमान ११ महिन्यांचा सेवाकालावधी पूर्ण होणे आवश्यक राहील) |
| **शैक्षणिक अर्हता व अनुभव** | | १) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२८) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग अ,भाग-अ-१, भाग-ब किंवा भाग-क या मध्ये नमुद केलल्या अर्हतापैकी एक अथवा भारतीय केंद्रीय वैद्यक परिषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय केंद्रीय वैद्यक परिषद/ भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग यांनी वेळोवेळी निर्देशित केलेली समतुल्य अर्हता.<br>२) सांविधानिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबंधित आयुर्वेद विषयातील पदव्युत्तर पदवी.<br>३) ज्या उमेदवारांचे आयुर्वेद विषयातील स्वतःचे मूलभूत संशोधन, निबंध अथवा पुस्तक, प्रसिध्द झालेली आहेत अशा उमेदवारांना प्राध्यान्य देण्यात येईल.<br>४) शैक्षणिक अर्हतेमधील (१) व (२) येथे दर्शविलेली अर्हता प्राप्त करुन घेतल्यानंतर, ज्याला आयुर्वेदाच्या संबंधित विषयामध्ये एकूण पाच वर्षे अध्यापनाचा अनुभव असेल त्यापैकी मान्यता प्राप्त संस्थेतून संबंधीत आयुर्वेदाच्या विषयाचे सहाय्यक प्राध्यापक पदाचा किमान तिन वर्षे अध्यापनाचा अनुभव आवश्यक राहील.<br>५) इंग्रजी, मराठी, संस्कृत आणि हिंदी या भाषेचे पुरेसे ज्ञान असावे म्हणजे त्यानुसार तो त्या भाषा सहजपणे लिहिण्यास, वाचण्यास व बोलण्यास समर्थ असला पाहिजे.<br>६) भा.चि.के.प/भा.चि.प.राष्ट्रीय आयोगाने निश्चित केलेला शिक्षक सांकेतांक (Teacher code) असणे आवश्यक आहे. |
| **मानधन** | | प्रतिमाह रु १,२०,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत. तसेच सदर मानधन हे अनुदान उपलब्धतेच्या व उमेदवाराच्या उपस्थितीनुसार अदा करण्यात येईल) |

| पदनाम | : | सहाय्यक प्राध्यापक |
|---|---|---|
| वयोमर्यादा | | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत (परंतु सदर अध्यापकांची त्याच्या वयाच्या ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत त्यांचा किमान ११ महिन्यांचा सेवाकालावधी पूर्ण होणे आवश्यक राहील) |
| शैक्षणिक अर्हता व अनुभव | | १) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२८) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग अ,भाग-अ-१, भाग-ब किंवा भाग-क या मध्ये नमुद केलल्या अर्हतापैकी एक अथवा भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद/ भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग यांनी वेळोवेळी निर्देशित केलेली समतुल्य अर्हता.<br>२) सांविधानिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबंधित आयुर्वेद विषयातील पदव्युत्तर पदवी.<br>३) ज्या उमेदवारांचे आयुर्वेद विषयातील स्वत:चे मुलभुत संशोधन, निबंध अथवा पुस्तके, प्रसिध्द झालेली आहेत अशा उमेदवारांना प्राध्यान्य देण्यात येईल.<br>४) इंग्रजी, मराठी, संस्कृत आणि हिंदी या भाषेचे पुरेसे ज्ञान असावे म्हणजे त्यानुसार तो त्या भाषा सहजपणे लिहिण्यास, वाचण्यास व बोलण्यास उमेदवार समर्थ असला पाहिजे.<br>५) भा.चि.के.प/भा.चि.प.राष्ट्रीय आयोगाने निश्चित केलेला शिक्षक सांकेतांक (Teacher code) असणे आवश्यक आहे.<br>**(ब) सहायक प्राध्यापक (संस्कृत) या पदाकरीता**<br>१) ज्याने एम.ए.(संस्कृत) किंवा व्याकरणाचार्य किंवा साहित्याचार्य यासारखी संस्कृत मधील पदव्युत्तर पदवी किंवा सांविधिक विद्यापीठाने किंवा विद्यापीठ अनुदान आयागाने मान्यता दिलेली तिच्याशी समतुल्य अर्हता धारण केली असेल.<br>२) ज्याच्याकडे इंग्रजी, मराठी, संस्कृत व हिंदी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल.<br>३) अ.क्रं. १ मधील अर्हतेसह बी.ए.एम.एस. पदवीधर उमेदवारास प्राध्यान्य देण्यात येईल.<br>४) भा.चि.के.प/भा.चि.प.राष्ट्रीय आयोगाने निश्चित केलेला शिक्षक सांकेतांक (Teacher code) असणे आवश्यक आहे. |
| मानधन | | प्रतिमाह रु १,००,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत. तसेच सदर मानधन हे अनुदान उपलब्धतेच्या व उमेदवाराच्या उपस्थितीनुसार अदा करण्यात येईल) |

## इतर अटी व शर्ती

| | |
|---|---|
| १ | कंत्राटी पध्दतीने करावयाच्या नियुक्तीचा कालावधी हा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून किंवा आस्थापना मंडळाकडून वा बदलीने तसेच अन्य प्रशासनिक कारणास्तव उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ११ महिने कालावधी यापैकी जे अगोदर घडेल तो कालावधी राहील. |
| २ | सदर पदावर नियमित उमेदवारांची नियुक्ती झाल्यास त्या तारखेस किंवा ११ महिन्यानंतर कंत्राटी स्वरुपाची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. |
| ३ | नियुक्तीसाठी बाहयशक्तीचा दबाव अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी आपोआप अपात्र ठरतील. |
| ४ | प्राध्यापक,सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक या पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी सोबत जोडलेल्या यादीतील नमूद कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती जोडाव्यात. उमेदवार सद्यस्थितीत कोणत्याही सेवेते कार्यरत असतील, अशा उमेदवारांना नियोक्त्यांकडुन "ना-हरकत प्रमाणपत्र" प्राप्त करुन अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. (ना-हरकत प्रमाणपत्राचा नमुना पुढे दर्शविण्यात आलेला आहे). तसेच प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहायक प्राध्यापक या पदावर शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड येथे नियुक्ती झाल्यास रुजू होते वेळी संबंधित संस्थेचे कार्यमुक्ती आदेश (relieving order) सोबत असणे आवश्यक राहील. |
| ५ | नियुक्ती आदेश मिळाल्यापासुन ७ दिवसांच्या आत नियुक्तीच्या ठिकाणी रुजू न झाल्यास नियुक्तीवरील दावा आपोआप संपुष्टात येईल. |
| ६ | उमेदवारास नियमित नियुक्त आणि कार्यरत असलेल्या अध्यापकांप्रमाणे पदाची कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील. |
| ७ | कंत्राटी पध्दतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकांनुसार अध्यापन, रुग्णसेवा अधिष्ठाता व विभागप्रमुख यांनी नेमुन दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील. तसेच या उमेदवारांना नियमित अध्यापकांप्रमाणे पूर्णवेळ काम करणे बंधनकारक राहील. तसेच त्यांना प्राप्त होणारी कागदपत्रे/माहिती व आधारसामग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील. |
| ८ | वरीलप्रमाणे विहित कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदाऱ्यांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहील. कार्यालयीन वेळेत खाजगी वैद्यकीय व्यवसाय करता येणार नाही. तसे आढळल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| ९ | उमेदवारास सार्वजनिक सुट्टी आणि रविवार व्यतिरिक्त फक्त ०८ नैमित्तिक रजा अनुज्ञेय राहतील. इतर कोणतीही रजा अनुज्ञेय राहणार नाही. |
| १० | कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त उमेदवारास कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत. तसेच उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही व मा. न्यायालयातही कंत्राटी पध्दतीची नियुक्ती कायम करण्याबाबतचा दावा करता येणार नाही. कंत्राटी पध्दतीवरील काम केलेला कालावधी सेवा निवृत्तीच्या लाभासाठी विचारात घेता येणार नाही. |
| ११ | कंत्राटी पध्दतीवरील नियुक्ती दिलेल्या उमेदवारास राजीनामा द्यावयाचा झाल्यास त्यांनी ३ महिन्यांची आगाऊ नोटीस अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड यांचेकडे देणे बंधनकारक राहील. ते शक्य नसल्यास ३ महिन्यांच्या मानधनाची रक्कम शासकीय कोषागारात जमा केल्यानंतर नियुक्त उमेदवाराचा राजीनामा अधिष्ठाता मंजुर करतील . |
| १२ | कंत्राटी पध्दतीवरील नियुक्ती केलेल्या उमेदवाराच्या कामकाजाचा आढावा विभागप्रमुख यांचेकडून नियमितपणे घेण्यात येईल. उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणूक आढळल्यास संबंधित उमेदवारांच्या नियुक्ती पुर्वसूचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राहतील. |
| १३ | शासन/सक्षम प्राधिकरण/कार्यालयाकडून वेळोवेळी निश्चित होणारे पदासंबंधीच्या आवश्यकतेप्रमाणे बंधपत्र रुजू होते वेळी देणे बंधनकारक राहील. तसेच शासन/सक्षम प्राधिकरण कार्यालयाकडून वेळोवेळी प्राप्त निर्देश/आदेशाचे पालन करणे बंधनकारक राहील. |
| १४ | उमेदवार वयाची ६५ वर्षे पूर्ण झाला त्यादिवशीच त्याची सेवा आपोआप संपुष्टात येइल. |
| १५ | सदर कंत्राटी पदाचे मानधनासाठी शासनाकडुन अनुदान उपलब्धतेनुसार मानधन अदा करण्यात येत असल्याने शासनाकडुन महाविद्यालयास अनुदान उपलब्ध होण्यास विलंब झाल्यास त्याप्रसंगी मानधन उपलब्ध होईपर्यंत मानधनासाठी कोणताही तगादा लावता येणार नाही. |
| १६ | सदर सेवा कालावधीत उमेदवाराच्या कोणत्याही कार्यशाळा, CME, चर्चासत्र व प्रशिक्षणाचा कर्तव्य कालावधी ग्राह्य धरण्यात येणार नाही. त्याकरीता उमेदवारास नियमाप्रमाणे नैमित्तिक रजा द्यावी लागेल अथवा सदर कालावधीचे मानधन कपात करण्यात येईल. |
| १७ | कंत्राटी सेवा कालावधीत वारंवार विनापरवानगी गैरहजर राहील्यास संबंधित उमेदवाराची कंत्राटी पध्दतीवरील नियुक्ती पुर्वसूचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राहतील. |
| १८ | नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर फेरबदल करण्याचे किंवा रद्द करण्याचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राखीव आहेत. |

तरी इच्छुक व पात्र उमेदवारांनी थेट मुलाखतीसाठी (Walk-In- Interview) मूळ प्रमाणपत्र व इतर आवश्यक त्या कागदपत्रांसह दिनांक ०८.०९.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड येथे उपस्थित रहावे.

सदरील ठिकाणी उपस्थित राहणेकरीता आपणांस कोणताही आनुषंगिक खर्च दिला जाणार नाही. याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

(वैद्य य.रा.पाटील)
अधिष्ठाता
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,नांदेड.

**(सध्या कार्यरत अध्यापकांनी मुलाखतीच्या वेळी सादर करणे बंधनकारक)**

## - ना हरकत प्रमाणपत्र -

प्रमाणित करण्यात येते की, वैद्य/वैद्या ......................... या महाविद्यालयात दिनांक ........... पासून ................. या पदावर कार्यरत आहेत. वैद्य/वैद्या ..................................... यांची शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड येथे प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/सहाय्यक प्राध्यापक या पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती झाल्यास महाविद्यालय त्यांना कार्यमुक्त करेल व त्यांच्या मुलाखतीस महाविद्यालयाची व संस्थेची काहीही हरकत नाही.

| संस्थाप्रमुख | प्राचार्य |
|---|---|
| ................... | ..................... |
| ................... | ..................... |
| ................... | ..................... |

ठिकाण :-
दिनांक :-

# अर्जाचा नमुना

**महाराष्ट्र शासन**

## शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, वजिराबाद, नांदेड

पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून त्यावर स्वतः स्वाक्षरी करणे

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड येथील प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/सहाय्यक प्राध्यापक ................. (विषय) या पदावर कंत्राटी पध्दतीने ११ महिन्यांच्या कालावधीकरीता नियुक्तीसाठीचा अर्ज.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | **संपूर्ण नाव** | | | |
| | | आडनाव | स्वतःचे नाव | वडिलांचे/पतीचे नाव |
| २. | **पत्रव्यवहाराचा पत्ता** | | पिनकोड | |
| | | एसटीडी कोडसह घरचा दूरध्वनी क्रमांक | | |
| | | भ्रमणध्वनी क्रमांक | | |
| ३. | **जन्म दिनांक** | | | |
| ४. | **अर्ज स्वीकारण्याच्या शेवटच्या दिनांकास वयः** ......... वर्ष .......... महिने ........ दिवस | | | |
| ५. | **राष्ट्रीयत्वः** | | | |

६. **शैक्षणिक अर्हताः** बीएएमएस प्रथम वर्षापासुन सुरुवात करावी व सोबत सर्व वर्षाच्या साक्षांकीत गुणपत्रीका जोडाव्यात

| अ.क्र. | बोर्डाचे/विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण केलेल्या परीक्षेचे नाव | उत्तीर्ण झालेले वर्ष | प्राप्त टक्केवारी | शासकीय सेवेतून निवृत्त झाले असल्यास प्रथम नियुक्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

७. **अवगत असणाऱ्या भाषाः** (योग्य त्या ठिकाणी (√) अशी खुण करावी)

| मराठी | हिंदी | इंग्रजी | संस्कृत/अन्य |
|---|---|---|---|
| | | | |

८. **कामाचा अनुभव** (प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडल्या असतील तरच अनुभव ग्राहय धरला जाईल.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेले पद | वेतनश्रेणी व इतर भत्ते | अनुभवाचा कालावधी | विद्यापीठाची शिक्षक मान्यता होती का ? असल्यास पत्र जोडावे | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |

९. **प्रकाशित लेखांचा तपशील :**

**प्रकाशित पुस्तकांचा तपशीलः**

| | |
|---|---|
| १० | पुरस्कार मिळाले असतील तर त्यांचा तपशील |
| ११ | अर्जासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रांच्या स्व-साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक राहील |

| Sr.No. | Document Name | |
|---|---|---|
| 01 | S.S.C. Passing Certificate (For D.O.B.)/T.C. (any one) | **YES/NO** |
| 02 | Nationality/Domicile | **YES/NO** |
| 03 | BAMS Ist Year to Final Year Marksheet | **YES/NO** |
| 04 | BAMS passing Certificate | **YES/NO** |
| 05 | Internship Completion Certificate | **YES/NO** |
| 06 | BAMS Degree Certificate | **YES/NO** |
| 07 | PG Degree Certificate/ Passing Certificate | **YES/NO** |
| 08 | Registration Certificate of State Council | **YES/NO** |
| 09 | MS-CIT or Equivalent Qualification | **YES/NO** |
| 10 | Experience Certificate | **YES/NO** |
| 11 | No Objection Certificate (Currently working candidates only) | **YES/NO** |
| 12 | Additional qualification in concern subject if any | **YES/NO** |
| 13 | Research Paper publication in National or International Peer reviewed index journal | **YES/NO** |
| 14 | Proof of Text Book/ Ref. Book/chapter written in any other book approved by University | **YES/NO** |
| 15 | Participation in National/International CME/Conference/Seminar etc. | **YES/NO** |

ठिकाण:-

दिनांक:-                                        उमेदवाराचे नाव व सही.

(रुजु होताना खालील प्रमाणपत्र सादर करावे)

## प्रतिज्ञापत्र (विवाहित उमेदवारांसाठी)
## महाराष्ट्र नागरी सेवा मर्यादित (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम-२००५ नुसार
## नियम -अ

मी श्री/श्रीमती ................................ श्री ................. ...... यांच मुलगा/मुलगी/पत्नी, वर्षे ......... राहणार याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१. मी ............................ या पदासाठी अर्ज दाखल केला आहे.

२. आज रोजी मला ............ (संख्या) इतकी हयात मुले आहेत.
त्यापैकी दिनांक २८.०३.२००५ यानंतर जन्माला आलेली मुलांची संख्या .......... आहे.
(असल्यास जन्म दिनांक नमूद करावा)

३. हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा जास्त असेल तर दिनांक २८.०३.२००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे या पदासाठी अनर्ह/अपात्र ठरविण्यास पात्र राहील याची मला जाणीव आहे.

ठिकाण:-

दिनांक:- उमेदवाराचे नाव व सही.

..............................................................................................

(रु.१००/- च्या बंधपत्रावर)

## प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती ...................................... प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो/करते की वर नमूद केलेली माहिती पूर्णतः खरी असुन ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या ठिकाणी कोणत्याही टप्प्यावर किंवा नियुक्तीनंतर रद्द करण्यात येईल आणि माझ्याविरुध्द कायदेशीर कार्यवाही होईल, याची मला जाणीव आहे. तसेच सदरची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी पध्दतीवर असल्यामुळे नियमित नियुक्तीसाठी मला हक्क सांगता येणार नाही. नियमित नियुक्तीचा उमेदवार उपलब्ध झाल्यास माझी तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी नेमणूक आपोआप रद्द होईल, याची मला जाणीव आहे. नियुक्ती आदेशातील सर्व अटी व शर्ती मला मान्य असुन त्याचे पालन करण्यास मी कटीबध्द आहे.

ठिकाण:-

दिनांक:- उमेदवाराची स्वाक्षरी